# सर्वसाधारण सभा

दि. ०९/०४/२०२३ वार : रविवार
ठिकाण:-प्रधान कार्यालय, मॉडेल कॉलनी,पुणे
वेळ:- दुपारी २:३० वाजता.

**उपस्थिति:-**

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती कांताजी काबरा | २.सौ.पुष्पाजी गो.राठी | ३.श्री.विनोदजी करवा |
| ४. श्री.राजेंद्रजी आसावा | ५.श्री.हरिशचंद्रजी चांडक | ६.श्री.सुरेशजी नावंदर |
| ७. श्रीमती निर्मलाजी लाहोटी | ८.श्रीमती मालाजी चांडक | ९.श्री.ओमप्रकाशजी मणियार |
| १०.श्रीमती संतोषजी तापडिया | ११.श्री,मनिषजी झंवर | १२.सौ.शांतीजी मुंदरा |
| १३.सौ.स्वातीजी मुंदडा | १४.सौ.नंदाजी बांगड | १५.सौ.अर्चनाजी लोहिया |
| १६.श्री.बंजरंगजी लोहिया | १७.श्री.शैलेशजी मालु | १८.श्री.नंदकिशोरजी काबरा |
| १९.श्री.संजयजी झंवर | २०.श्री.दिपकजी चांडक | २१.श्री,राहुलजी बुब |
| २२.श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर | २३.श्री.चिरागजी राठी | २४.श्री.अश्विनजी चांडक |
| २५.श्री.नंदकिशोरजी राठी | २६.श्री.सुनिलजी बिहाणी | २७.श्री.सचिनजी मंत्री |
| २८.श्री.कैलासजी सिकची | २९.सौ.शीलाजी जाजु | ३०.सौ.मालतीजी चांडक |
| ३१.श्री.शामजी चांडक | ३२.सौ.नम्रताजी जाजु | ३३.श्री.संजयजी जाखोटीया |
| ३४.सौ.प्रतिभाजी काबरा | ३५.श्री.रविजी काबरा | ३६.सौ.लताजी लाहोटी |
| ३७.श्री.दर्शनजी मुंदडा | ३८.श्री.प्रविणजी भन्साली | ३९.श्री.मनिषजी भट्टड |
| ४०.श्री.राजेंद्रजी डागा | ४१.सौ.अंजलीजी करवा | ४२.सौ.सारीखाजी इनानी |
| ४३.श्री.सचिनजी मालपाणी | ४४.श्री.अमोलजी करवा | ४५.श्री.अतुलजी लाहोटी |
| ४६.श्री.श्रीकांतजी लखोटिया | ४७.श्री.अमोलजी भट्टड | ४८.श्री.मनिषजी कासट |
| ४९.सौ.पुष्पाजी तोष्णीवाल | ५०.श्री.मनोजजी कासट | ५१.सौ.मिनाक्षीजी सारडा |
| ५२.श्री.शेखरजी मुंदडा | ५३.श्री.बालकृष्णजी करवा | ५४.श्री.पुरूषोत्तमजी लोहिया |
| ५५.श्री.लक्ष्मीकांतजी मनियार | ५६.सौ.लताजी काबरा | ५७.सौ.स्नेहलताजी धूत |
| ५८.श्री.रमेशजी धूत | ५९.श्री.आशिषजी बिहाणी | ६०.सौ.सुरेखाजी करवा |
| ६१.श्री.राजेंद्रजी तापडिया | ६२.श्री.प्रकाशजी.जी.मुंदडा | ६३.सौ.वंदनाजी मुंदडा |
| ६४.श्री.गोविंदजी जाजु | ६५.श्री.विठ्ठलजी मनियार | ६६.श्री.प्रितमजी करवा |
| ६७.सौ.कल्पनाजी मंत्री | ६८.सौ.निलमजी बिर्ला | ६९.श्री.निरजजी लखोटिया |
| ७०.सौ.सुशिलाजी राठी | | |

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाची सर्वसाधारण सभा दि.०९.०४.२०२३ रोजी रविवार रोजी दुपारी २.३० वा. निश्चित करण्यात आली होती. परंतु आवश्यक कोरम नसल्याने सभा तहकुब करून उपस्थितांच्या परवानगीने दु.३.०० वा. सुरू करण्यात आली त्यास सर्व सदस्यांनी समंती दिली. येणेप्रमाणे पुढील कार्यवाहीस सुरू करण्यात आली.

मंडळाच्या सचिव सौ.सुशिलाजी राठी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांना सभेचे अध्यक्ष स्थान स्विकारण्याची विनंती केली. येणेप्रमाणे श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारून पुनश्च सर्वांचे स्वागत व आभार प्रदर्शित केले व आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, सर्वसाधारण सभा असा व्यासपीठ आहे की, कार्यकर्त्यांनी व पदाधिका-यांनी केलेल्या कामाचा लेखाजोखा येथे सादर करता येतो. मागील काही वर्षापासून मंडळाचे कार्य वेगाने सुरू असुन कार्यकर्त्यांचे समर्पण

यामाध्यमातून दिसुन येते. आपण शैक्षणिक क्षेत्रात काम करतो. विद्यार्थ्यांना काय पाहीजे. यावर मंडळाने मोठया प्रमाणावर कार्य सुरू केले आहे. त्यामुळे येणा-या काळात Student Centric पध्दतीने कार्य करून पुढे जायचे आहे. नवनविन प्रकल्प आपण राबवत आहोत. जागतिक पातळीवर मंडळाचे नाव न्यायचे आहे. त्यामुळे सर्व जगाचे मंडळाकडे लक्ष असणार आहे.

कोविडमुळे सर्वसाधारण सभेचे शेड्युल विस्कळीत झाले होते ते नियमित व्हावे म्हणून सदर सर्वसाधारण सभा घेणे आवश्यक आहे. यानंतर आपली पुढील सर्वसाधारण सभा नियमित म्हणजे सप्टेंबर, ऑक्टोंबर मध्ये होईल.

यानंतर मंडळाच्या सचिव सौ.सुशिलाजी राठी यांनी सभेस सांगितले की, मंडळाच्या प्रथेप्रमाणे सभेपूर्व अहवाल वर्षात आपल्या दिवगंत सदस्य, कार्यकर्त्यांना श्रध्दांजली अर्पित करू. येणेप्रमाणे खालीले व्यक्तिना श्रध्दांजली अर्पित करण्यात आली.

## शोकप्रस्ताव - ०१.०४.२२ ते ०९.०४.२०२३

| अ.क्रं | शोकप्रस्ताव भेजा हुआ दि, | शोकप्रस्ताव भेजा उनका नाम | गांव | रिश्ता | स्वर्गिय व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४.०४.२०२२ | श्री.सत्येंद्रजी राठी / सौ.मोनिकाजी राठी | पुणे | आपकी बेटी | स्व. प्रियम राठी, पुणे |
| २ | १४.०४.२०२२ | श्री.किशोरजी झंवर | पुणे | बहन | स्व. विजयाजी दरक, पुणे |
| | | सौ.संध्याजी झंवर | पुणे | ननंद | स्व. विजयाजी दरक, पुणे |
| ३ | १४.०४.२०२२ | श्री.आदित्यजी मणियार | पुणे | जिजाजी | स्व. मनिषजी राठी, दुर्ग |
| ४ | ०२.०६.२०२२ | श्री.नितीनजी मानधना | बंगलोर | पिताजी | स्व. श्री. नारायणदासजी मानधना, मुंबइ |
| ५ | ०२.०६.२०२२ | श्री.सुधाकरजी बेहेडे | पुणे | बडे दामादजी | स्व. श्री. मनोजजी फुलचंदजी भंडारी, संगमनेर |
| ६ | ०६.०६.२०२२ | श्री.नंदकिशोरजी काबरा | पुणे | छोटी लडकी | स्व.सौ.नयनजी योगेशजी लवाटे |
| ७ | १५.०७.२०२२ | श्री.ब्रम्हानंदजी लाहोटी | पुणे | पिताजी | स्व. श्री.राधाकिसनजी पुरुषोत्तमजी लाहोटी, पुणे |
| | १५.०७.२०२२ | श्रीमती पद्माजी धूत | पुणे | भाई | स्व. श्री.राधाकिसनजी पुरुषोत्तमजी लाहोटी, पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | १७.०९.२०२२ | श्री.महेशजी झंवर | पुणे | पिताजी | स्व.ॲड.श्री.बाबुलालजी गुलाबचंदजी झंवर, पुणे |
| ९ | १७.०९.२०२२ | श्री.मिश्रीलालजी झंवर | मुंबई | बडे भाईसाहब | स्व.लखीचंदजी नंदलालजी झंवर, जलगांव |
| १० | ११.१०.२०२२ | सौ.पुष्पाजी राठी | पुणे | माताजी | स्व. श्रीमती नारायणी बाई अट्टल, औरंगाबाद |
| ११ | १५.१०.२०२२ | श्री.संजयजी बिहाणी / श्री.संतोषजी बिहाणी | पुणे | बडे भाईसाहब | स्व.श्री.राजेंद्रजी शामसुंदरजी बिहाणी, पुणे, घोडनदी |
| | १५.१०.२०२२ | सौ.संगीताजी बिहाणी | पुणे | जेठजी | स्व.श्री.राजेंद्रजी शामसुंदरजी बिहाणी, पुणे, घोडनदी |
| १२ | २१.१०.२०२२ | श्रीमती चंचलाजी माहेश्वरी | पुणे | पती | स्व.श्री.मनोहरजी माहेश्वरी, पुणे |
| १३ | ०८.११.२०२२ | श्रीमती शिलाजी बांगड | पुणे | पती | स्व.श्री.श्रीनिवासजी बंसीलालजी बांगड, पुणे |
| | | श्री.शैलेशजी बांगड | पुणे | पिताजी | स्व.श्री.श्रीनिवासजी बंसीलालजी बांगड, पुणे |
| १४ | ०८.११.२०२२ | डॉ.श्री.राजेशजी तापडिया | पुणे | माताजी | स्व.श्रीमती रमाबाई मोहनलालजी तापडिया, पुणे |
| १५ | | सौ.गायत्रीजी तापडिया | पुणे | सासुजी | स्व.श्रीमती रमाबाई मोहनलालजी तापडिया, पुणे |
| १६ | ०२.१२.२०२२ | श्री.अभयजी बिर्ला | पुणे | माताजी | स्व. श्रीमती राजकमलजी माणिकजी बिर्ला, पुणे |
| १७ | २०.१२.२२ | श्रीमती निर्मलाजी लाहोटी | पुणे | पिताजी | स्व.श्री.मनोहरलालजी बियानी, मूर्तिजापुर |
| १८ | २१.१२.२०२२ | श्री.सुनिलजी राठी | पुणे | माताजी | स्व.श्रीमती.सिताबाई हेमराजजी राठी, पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | ३०.१२.२०२२ | श्री.पंकजजी मानधने / श्री.आंनदजी मानधने | पुणे | पिताजी | स्व.श्री.रामेश्वरजी मानधने, पुणे |
| २० | १६.०१.२०२३ | श्री.देवेंद्रजी राठी | पुणे | पिताजी | स्व.श्री.बंकटलालजी श्रीनिवासजी राठी, पुणे |
| २१ | १६.०१.२०२३ | श्री.घनश्यामजी राठी / श्री.कृष्णकुमारजी राठी | पुणे | भाई | स्व.श्री.बंकटलालजी श्रीनिवासजी राठी, पुणे |
| २२ | २५.०१.२०२३ | श्री.मनिषजी भट्टड | पुणे | सासुजी | स्व.सौ.सीताजी पांडुलालजी सोनी, पुणे |
| २३ | ३०.०१.२०२३ | श्री.अमोलजी करवा | पुणे | भाई | स्व.श्री.अनुपजी मोहता |
| २४ | ३०.०१.२०२३ | सौ.मालतीजी चांडक | पुणे | भानजा | स्व.श्री.अनुपजी मोहता |
| २५ | ३०.०१.२०२३ | सौ.सुनंदाजी राठी | पुणे | बहनोंई | स्व.श्री.अनुपजी मोहता |
| २६ | ०७.०२.२०२३ | श्री.सचिनजी चांडक सौ.निलमजी चांडक | आष्टा | ससुरजी / पिताजी | स्व श्री सुभाषचंद्रजी झंवर, आष्टा |
| २७ | १२.०२.२०२३ | व्रंदाजी डागा / परिवार | पुणे | सासुजी | स्व.श्रीमती बागेशजी डागा |
| २८ | १३.०२.२०२३ | श्री.उमेशजी झंवर श्री.संजयजी झंवर | पुणे | माताजी | श्रीमती शांताबाई श्रीनिवासजी झंवर, पुणे |
| २९ | १७.०२.२०२३ | धूत परिवार | पुणे | | स्व.श्री.पूनमचंदजी मेघराजजी धूत, पुणे |
| ३० | १७.०२.२०२३ | श्री.मिश्रीलालजी झंवर<br>श्री.विजयाजी झंवर<br>श्री,अविनाशजी झंवर | मुंबई | सासुजी<br>माताजी<br>नानीजी | |
| ३१ | २१.०२.२३ | श्री.मुकुंदजी भुतडा | पुणे | माताजी | श्रीमती कौसल्याजी लादुरामजी भुतडा, पुणे |
| ४७ | २१.०२.२३ | सौ.व्रंद्राजी डागा | पुणे | सासुजी | स्व. श्रीमती बागेश्वरीजी डागा, पुणे |

यानंतर सभेस विषयानुरूप सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.१:- मंडल की सर्वसाधारण सभा दि. ०३.०४.२०२२ के इतिवृत्तांत को मंजूर करना ।**

सभाध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेला सांगितले की, मागील सभेचा कार्यवृत्तांत सर्वांना दिलेला आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यात काही दुरूस्ती किंवा सुचना असल्यास सुचवाव्यात. येणेप्रमाणे सदर कार्यवृत्तांतात दुरूस्ती व सुचना नसल्याने मागील सभेचा कार्यवृत्तांत सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सुचक :- श्री.मनिषजी कासट

अनुमोदक :- सौ.नम्रताजी जाजु

**विषय क्र.२:- मंडल के चल रहे वि.ना.लाहोटी वि.भवन / ऐरोली वि.भवन / महेश विद्यालय पुणे प्रकल्प तथा नयी गतीविधियों के बारे मे जानकारी लेना ।**

मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी आपल्या प्रस्तुतीकरणाच्या माध्यमातून मागील वर्षभरात सुरू असलेल्या कामांचा आढावा सादर केला व सभेस सांगितले की. हे सर्व उपक्रम राबविणे सोपे नसून कार्यकर्ते जे स्वत:ला झोकून काम करतात त्याचेच फलस्वरूप आहे. आपले कार्यकर्ते विविध समित्यांवर कार्य करतात व त्या समितीच्या कार्यास न्याय देतात.

मंडळाचे वि.ना.लाहोटी वि.भवनाचे पुर्नविकासाचे काम सुरू आहे. तसेच ऐरोली गर्ल्स हॉस्टेलचे काम सुरू आहे व महेश विद्यालय येथे प्रस्तावित CBSE स्कुल करण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे. वि.ना.लाहोटी वि. भवनाच्या संदर्भात प्रकल्प प्रमुख म्हणून मंडळाचे जी.सी.सदस्य श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर हे काम पहात आहेत. वि.ना.लाहोटी वि.भवन प्रकल्पाचे काम जोरात सुरू आहे. पुणे महानगरपालिकेच्या डी.सी नियमावलीमध्ये झालेल्या बदलांमुळे आपल्याला याठिकाणी १ मजला म्हणजे ६ वा मजला वाढवून मिळणार आहे. त्याची परवानगी मिळविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याकरिता श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर बरेच प्रयत्नशिल आहेत व मेहनत घेत आहेत. जवळ जवळ १०००० स्के.फुट आपल्याला एरिया मिळणार आहे ही आनंदाची बाब आहे. इतर रूम्सचा वापर सुरू करणार आहोत. सदर वाढीव मजल्याचे बांधकाम नोव्हेंबर पर्यंत पूर्ण होईल. वाढीव मजल्याचे आपण पुर्णपणे ॲक्टिव्हिटीसाठी वापर करणार आहोत. त्यामुळे मुलांना स्पेस मिळेल आपण नुसती राहण्यासाठी जागा उपलब्ध करत नसून विद्यार्थ्यांना चांगले संस्कार देण्याचे काम वसतिगृहाच्या माध्यमातून करत आहोत. त्यामुळे जगभरात आपले नाव लौकीक आहे. याप्रकल्पात आपले उदारमना दानदाते आहेत त्यांचे ही आभार मानले पाहिजे. त्यांनी आर्थिक संबल देण्याचे काम केलेले आहे. मंडळाचे CSR मध्येही मोठ्या प्रमाणावर कार्य सुरू आहे. यामाध्यमातून मंडळाला डोनेशन मिळवायचे आहे म्हणजे असे मोठे मोठे प्रकल्प आपल्याला उभे करता येतील. CSR च्या अंतर्गत पुण्यातील नामवंत उद्योजक श्री.केलाजी (Net Protector) यांनी वि.ना.लाहोटी वि.भवन येथिल मैदानासाठी उदारमना रू.१ कोटी डोनेशन दिले आहे. तसेच यासभेत घोषणा करतांना आनंद होत आहे की, कै.दुर्गाप्रसादजी कासट यांनी आपले संपूर्ण जिवन यासंस्थेसाठी समर्पित केले त्यांच्या नावाने त्यांचे सुपुत्र श्री.मनिषजी कासट यांनी रू.३१,००,०००/- लाख देण्याचे घोषित केले आहे. अशा उदार दानदात्यांचे मंडळातर्फे मनपूर्वक अभिनंदन व आभार !

यानंतर मंडळाच्या ऐरोली येथिल गर्ल्स हॉस्टेल प्रकल्पाची माहिती देण्यात आली की, याठिकाणी ही NMMC च्या नियमावली मध्ये झालेल्या बदलांमुळे आपल्याला वाढीव २ मजले मिळाले असून आता सदर इमारत ७ मजल्याची होणार आहे. याकामी परवानगी घेण्याचे काम सुरू करण्यात येत आहे. याठिकाणी आता १२६ मुलींच्या व्यवस्था करता येणार असून सदर प्रकल्प आक्टोंबर च्या अखेरीस पूर्ण करण्याचा मानस आहे.

सदर प्रकल्पाला उशिर झालेला आहे हे निश्चित आहे. काही काळ Flemingo च्या परवानगीसाठी लागला, तर सुरूवातीच्या काळात हार्डरॉकच्या खोदाईत वेळ लागला. परंतु आता जोरात काम सुरू आहे. त्यासंदर्भातले कॉन्ट्रक्टरचे शेड्युल सभेसमोर ठेवण्यात आले.

सदर वसतिगृहाच्या उद्घाटन कार्यक्रमात श्रीमती ल.ला.मुंदडा वि.भवनाच्या पुर्नविकासाच्या प्रकल्पाच्या उद्घाटनाची तारीख जाहीर करण्यात येईल असे श्री.अतुलजी लाहोटी यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, ऐरोली गर्ल्स हॉस्टेलच्या प्रकल्पासाठी श्री.माणकचंदजी काबरा / श्री.वसंतलालजी चांडक/ श्री.मिश्रीलालजी झंवर तसेच

विश्वस्त श्री.जुगलकिशोरजी मुंदडा यांना मोठया प्रमाणावर मेहनत घेऊन दानदाते मिळवून दानराशी जमा केली त्यामुळे त्यांचे सर्वांचे आभार !

यानंतर कोथरूड येथिल महेश विद्यालय येथे प्रस्तावित प्रकल्पाबाबत अध्यक्षांनी माहिती दिली की, महेश विद्यालय येथे स्वत:चे गेट नव्हते त्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता परंतु मंडळाने आता याठिकाणी पुणे मनपा च्या ताब्यातील शाळा आरक्षित जागा साधारण ५२३ स्के मी. एवढी जागा दिर्घ मुदतीने घेतली असून आपण १०० फूटी डी.पी रोडच्या फ्रंटला आलो आहोत त्या अनुषंगाने त्यावर आधारित आपल्या प्रस्तावित प्रकल्पाचे काम मंडळाचे विश्वस्त श्री.नंदकिशोरजी राठी यांनी सुरू केले. याठिकाणी होणा-या प्रकल्पाबाबत श्री.नंदकिशोरजी राठी हे सभेस माहिती देतील अशी त्यांना विनंती करतो.

श्री.नंदकिशोरजी राठी - प्रस्तावित प्रकल्पामध्ये CBSE गर्ल्स हॅास्टेल, बॅाईज् हॅास्टेल करणार आहोत. याप्रकल्पासाठी आर्कि.बर्वे काम करत आहेत. सदर प्रकल्प ३ फेज मध्ये होणार आहे. पहिल्या फेज मध्ये गर्ल्स हॅास्टेल होईल नंतर CBSE शाळा व नंतर बॅाईज् हॅास्टेल याठिकाणी हाईटच्या मर्यादा असल्यामुळे आपल्याला MOD ची परवानगी लागणार होती त्यासाठी अर्ज केलेला आहे. जवळजवळ रू. १० कोटीचा हा प्रकल्प असून याठिकाणच्या उपलब्ध अॅसेटच्या पुर्णपणे उपयोग करणार आहोत. हा प्रकल्प सुरू करण्याच्या अगोदर CBSE शाळेच्या नियमावली तपासुन घेण्यात येतील मगच प्रकल्प सुरू करू.

यानंतर अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी माहिती दिली की, सोलापूर येथिल मंदीर ट्रस्टच्या जागेसंदर्भात प्राथमिक अॅग्रीमेंट झाले असून चांगल्या टर्म्स आणि कन्डीशनस् वर सदर अॅग्रीमेंट फ्रीज करण्यात आले असून सदर प्रकरण मे.धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे पुढील महिन्याभरात परवानगीसाठी दाखल करण्यात येईल. त्यासाठीच्या आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे काम सुरू आहे. सदर प्लॅाट २ एकरचा असून महाराष्ट्रातील सर्वोत्तम शाळा येथे उभारण्याचा मानस आहे.

मंडळाच्या विद्यार्थी भवनाचा चांगला नावलौकीक असल्यामुळे बाहेर गावावरून येणा-या विद्यार्थ्यांना व पालकवर्गांना मंडळाच्याच वि.भवनात प्रवेश मिळावा अशी इच्छा असते व त्यांची पहिली पसंती आपल्या वसतिगृहांना असते त्यामुळे प्रचंड मागणी असते. विद्यार्थ्यांची व्यवस्था होणे गरजेचे व त्याला मंडळाचे प्राधान्य आहेच म्हणून रेंटल मॅाडेल सुरू केले. आता आपण इतर ट्रस्ट बरोबर कोलॅबरेशन करून वसतिगृह व इतर उपक्रम देखील चालवणार आहोत. आपल्याला सांगताना आनंद होतो की, पुण्याच्या अत्यंत मध्यवर्ती भागात लक्ष्मी रोड श्री.मुकुंद भवन ट्रस्टने वसतिगृहासाठी प्लॅाट विकत घेतला असून त्याठिकाणी बांधकामाची सुरूवात करण्यात आली आहे. सदर वसतिगृह मंडळाव्दारे मॅनेज केले जाईल असे ठरले आहे. येणा-या ऑक्टोंबर महिन्यामध्ये सदर वसतिगृह सुरू करण्याचा मानस आहे. याठिकाणी १२५ मुलींची व्यवस्था होणार असून अत्याधुनिक परिपूर्ण असे हे वसतिगृह होणार आहे.

मंडळाकडून विविध प्रकारच्या छात्रवृत्ती वाटप करण्यात येतात. कोरोना काळात ही आपण वितरण केले आहे. मंडळ वितरण मोठया प्रमाणावर करत आहोत. अर्ज करणा-याला आपण छात्रवृत्ती देत आहोत. आता छात्रवृत्तीचा कॅारपस वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे यामाध्यमातून आपणांस आवाहन करत आहोत. तसेच यासोबत आपण स्वावलंबन योजना राबवित आहोत त्याच्यात आतापर्यंत ५० विद्यार्थ्यांना लाभ मिळत आहे. त्यांचे जिवन बदलण्यात आपण यशस्वी होत आहोत. कोरोनामुळे आपल्याला ऑनलाईन प्रेझेन्सचे महत्व कळले परंतु विद्यार्थी वर्गांमध्ये लॅपटॅाप, इंटरनेट सारख्या सुविधा प्रत्येकाकडे उपलब्ध नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये त्याकरिता लॅपटॅाप वितरणाची स्कीम सुरू करण्यात आली सुरूवातील श्री.मुकुंदभवन ट्रस्टच्या वतीने माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या माध्यमातून १०० लॅपटॅाप वितरीत करण्यात आले आता हा उपक्रम आपल्याला मोठयाप्रमाणात राबवायच्या आहे. त्यामुळे मंडळाचे नाव घराघरामध्ये पोहचले आहे. याच अनुषंगाने जालना येथिल महाराष्ट्र ट्रेड फेअर मध्ये देखील लॅपटॅाप वितरण करण्यात आले. तसेच मंडळतर्फे त्याठिकाणी विविध क्षेत्रामधील उत्तुंग कामगीरी करणा-या व्यक्तिंचे वेगवेगळे सेमिनार घेण्यात आले जवळजवळ लाखांच्या प्रमाणात लोकांनी त्याठिकाणी भेट दिली. तसेच मंडळातर्फे स्टॅाल लावण्यात आला होता. त्यामुळे मंडळाचे नाव सर्व दूर प्रत्येक माहेश्वरी घराघरामध्ये पोहचले आहे. लॅपटॅाप वितरण त्याठिकाणचा महत्वाचा उपक्रम ठरला.

यानंतर संस्थेव्दारे सुरू करण्यात आलेल्या नविन उपक्रम द्रोणालया, क्राउड फंडीग, फायनान्स कनेक्ट, इंटरनॅशनल कनेक्ट, सस्टेनॅबिलीटी, स्टार्ट अप , सी.एस.आर डोनेशन या उपक्रमांबाबत श्री.अतुलजी लाहोटी यांनी PPT च्या माध्यमातून विस्तारीत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, मंडळाचे जे पारंपारिक किंवा शाळा, वसतिगृहे

यांच्या व्यतिरिक्त सदर उपक्रम मंडळाव्दारे सुरू करण्यात आले असून यामाध्यमातून संस्थेचा विकासाचा ग्राफ वाढणार आहे असे आश्वासित केले.

**विषय क्र.३ :- वर्ष २०२१-२०२२ के ऑडीटेड आय व्यय पत्र तथा तुलन पत्रको स्वीकृती देना।**

**व**

**विषय क्र.४ :- वर्ष २०२३-२०२४ के वित्त संकल्प की जानकारी लेकर स्वीकृती देना।**

मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.अमोलजी भट्टड यांनी वर्ष २०२१-२०२२ चा ऑडीटेड आय-व्यय पत्र व तुलन पत्र तसेच २०२३-२०२४ चा अर्थ संकल्प सभेसमोर विस्तारित स्वरूपात मांडला.

(Amount in Rs.Lakh)

| Sr.No. | Unit Name | Audited FY 19-20 | Audited FY 20-21 | Audited FY 21-22 |
|---|---|---|---|---|
| A | Maheshwari Vidya Pracharak Mandal | -55.65 | -23.22 | -60.42 |
| B | V.N.Lahoti Vidyarathi Bhavan | -21.54 | -91.30 | -14.51 |
| C | RBHR Rathi Vidyarathi Bhavan | 31.67 | -19.56 | 26.95 |
| D | H.R. Rathi Vidyarathi Bhavan | 43.22 | -16.99 | 41.53 |
| E | L.L.Mundada Vidyarathi Bhavan | 36.92 | -15.98 | 0.43 |
| F | Murlidhar Sarda Vidyarathi Bhavan | -2.76 | -3.55 | -3.34 |
| G | Laxmi Hostel (Rented Property,Pune) | 46.19 | -6.30 | 10.20 |
| H | Baner Hostel (Rented Property,Pune) | -3.85 | -41.64 | -7.20 |
| I | Nirantar Hostel (Rented Property,Pune) | 2.89 | -28.10 | -7.70 |
| **B to I** | **Total All Hostel** | **132.74** | **-223.43** | **46.37** |
| J | Mahesh Vidyalaya Marathi Medium,Pune | 30.09 | 8.69 | 43.41 |
| K | Mahesh Vidyalaya English Medium,Pune | 123.78 | 123.81 | 171.91 |
| L | Mahesh Bal Bhavan, Pune | 16.26 | 0.24 | 9.45 |
| M | Damani Vidya Mandir, Solapur | 12.04 | 32.81 | 76.31 |
| N | Chandak English School, Solapur | 85.56 | 219.74 | 179.58 |
| O | Deshbhakha H. B. Soni Collage | 27.45 | 36.13 | 7.54 |
| **J to O** | **Total All School** | **295.19** | **421.42** | **488.21** |
| | **Grand Total Surplus (Defecit)** | **372.28** | **174.77** | **474.15** |

सदर विषयी सभेत विस्तारित चर्चा करण्यात आली व वर्ष २०२१-२०२२ च्या ऑडीटेड आय-व्यय पत्र, तुलन पत्र तसेच वर्ष २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. येणेप्रमाणे खालील ठराव पारित करण्यात आले.

**ठराव-** मंडळाच्या वर्ष २०२१-२०२२ च्या ऑडीटेड आय-व्यय पत्र तसेच तुलन पत्रास आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. तसेच मंडळाच्या वर्ष २०२३-२०२४ च्या अर्थ संकल्पावर विचार विनिमय करून आजची सर्वसाधारण सभा त्यास सर्वानुमते स्विकृती देत आहे.

सुचक :- श्री. राजेंद्रजी आसावा
अनुमोदक :- श्रीमती निर्मलाजी लाहोटी
ठराव :- सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५ :- वर्ष २०२३-२०२४ के हिसाब की जाँच के लिये लेखा परीक्षक की नियुक्ती एवं उनका पारिश्रमिक निश्चित करना ।**

मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी सभेस सांगितले की, एन.आर.काबरा ॲंड असोसिएटस् तर्फे श्री.नंदकिशोरजी काबरा यांनी मंडळाचे ऑडीटचे काम मागील ५ वर्षापासून पाहिले. खुप चांगले काम त्यांनी या कालावधीत केले. परंतु त्यांना आता ५ वर्ष झाल्यामुळे नविन फर्मची नियुक्ती करावी लागणार आहे. त्यासाठी VDA & Associates यांचे नाव आजच्या सभेसमोर प्रस्तावित आहे. त्याला सभेने संमती दयावी. याआधी VDA & Associates ने मंडळाचे ऑडीटर म्हणून काम केलेले आहे. तसेच त्यांचे मानधन ही निश्चित करण्यात यावे.

यानंतर सभेत विस्तारित चर्चा करण्यात आली व VDA & Associates यांना मंडळाचे वर्ष २०२३-२०२४ करिता लेखा परिक्षक म्हणून नियुक्त करण्यात येते व सध्या देण्यात येणा-या मानधनात १०% वाढ करून मानधन देण्यात यावे असे आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे. येणेप्रमाणे खालील ठराव पारीत करण्यात आला,

**ठराव**- मंडळाचे वर्ष २०२३-२०२४ करिता लेखा परिक्षक म्हणून VDA & Associates यांची नियुक्ती करत असून त्यांना सध्या देण्यात येणा-या मानधनामध्ये १०% वाढ करून मानधन दयावे असे आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते ठरवित आहे.

सुचक :- श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर
अनुमोदक :- सौ.शीलाजी जाजु
ठराव :- सर्वानुमते मंजूर

यानंतर मंडळाचे जेष्ठ सदस्य श्री.विठ्ठलशेठजी मनियार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या की, मंडळाचे काम मोठे आहे. कार्यबाहुल्यामुळे सारखे येणे होत नाही परंतू मंडळाबद्दल, मंडळाच्या कार्याबद्दल ऐकतो त्याचे कौतुक व आनंद वाटतो असेच कार्य करत रहा व मंडळाचे नाव मोठे करा हेच यानिमित्ताने सांगतो.

श्री.राजेंद्रजी तापडिया-श्री अतुलजी लाहोटी आणि त्यांची टीम ने अतिशय उत्तम काम करत आहे. असेच कार्य सुरू ठेवावे हिच इच्छा.

यानंतर श्री.बजरंगजी लोहिया यांनी जालना येथिल महाराष्ट्र ट्रेड फेअर येथे मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सेमिनार संदर्भात विस्तारित माहिती दिली. श्री.लक्ष्मीकांतजी नावंदर, श्री.शैलेशजी मालु व श्री.बालकृष्णजी करवा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर मंडळाचे अध्यक्ष श्री.अतुलजी लाहोटी यांनी समाधान व्यक्त केले की, कार्यकर्ते मंडळाला वेळ देतात व समर्पणाने काम करतात त्यांच्या मुळेच मंडळ शिखरावर पोहचत आहे. मंडळाकडून सर्व कार्यकर्त्याचे, दानदात्यांचे मनपूर्वक आभार !

यानंतर मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.शेखरजी मुंदडा यांनी सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर केले.

**सभाध्यक्ष**